**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये सुधारणांच्या अनुषंगाने शिफारशी सूचविण्याकरीता समिती गठीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृहनिर्माण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांकः सेप्रनि-२०२५/ प्र.क्र.१२८/ गृनिभू,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- १९ ऑक्टोबर, २०२६**

**वाचा:-** १) गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, अधिसूचना क्र. एमएचए १०९२/ सीआर-६५१/ डी-तीन दिनांक ०२ डिसेंबर, १९९७

२) सचिव, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचे पत्र क्र. एमएच/ सेप्रनि/ २०२५/ ७१७५३९५/ प्र.१७ दिनांक १३ ऑक्टोबर, २०२५

३) अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१.०१.२०२४ रोजी बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम वाचा क्र.१ येथील अधिसूचनेन्वये अधिसूचित करण्यात आले आहेत. या सेवाप्रवेश नियमाबाबत म्हाडा प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील सरळ सेवेने नियुक्त उप अभियंता व पदोन्नतीने नियुक्त उप अभियंता या दोन्ही अधिका-यांच्या मागण्या विचारात घेऊन शिफारशी करण्यासाठी म्हाडा प्राधिकरणाने तटस्थ समिती गठित केली होती. सदर समितीच्या शिफारशींनुसार व प्राधिकरणाच्या ठरावानुसार वाचा क्र.२ येथील दि.१३ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये सुधारणाबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. प्रस्तुत प्रकरणी अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण विभाग) यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक ३१.०१.२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्देशानुसार शासनस्तरावरुन समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये सुधारणांच्या अनुषंगाने शिफारशी सूचविण्याकरीता खालील नमूद केल्याप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १ | सहसचिव (गृनिभू), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई | अध्यक्ष |
| २ | सहसचिव / उपसचिव, ( का.१२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३ | सहसचिव/ उपसचिव, (आ (वर्ग-१)) जलसंपदा विभाग, मंत्रालय मुंबई | सदस्य |
| ४ | सहसचिव/ उपसचिव, (सेवा-१) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई | सदस्य |
| ५ | सचिव, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई | सदस्य |
| ६ | अवर सचिव (विधी), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ७ | कक्ष अधिकारी (गृनिभू), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य सचिव |

२. समितीची कार्यकक्षाः-

१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग या विभागातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमानुसार आहेत, त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत शिफारशी सुचविणे.

२) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई यांच्या दिनांक १३ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या प्रस्तावाची तपासणी करणे व त्याबाबत आवश्यक त्या शिफारशी सुचविणे.

३) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या संवर्गाचे सेवाप्रवेश नियमांच्या आणखी काही मुद्यांचा समावेश करण्याची समितीस मुभा राहील.

३. समितीचे अध्यक्ष यांना विशेष निमंत्रित म्हणून योग्य वाटेल अशा तज्ञ अधिकारी यांना बैठकीस आमंत्रित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. सदर समितीने आपला स्वयंस्पष्ट अहवाल शिफारशींसह ०३ महिन्यांच्या मुदतीत शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०१९१७२७२४६१०९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

VIDYA RAMAPPA HAMPAYYA

Digitally signed by VIDYA RAMAPPA HAMPAYYA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=7b40f543d9d95d4cad6707bb7eae1089289d9878b7cb34418f111566e3223ba1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A94EF1B631F4673B829AC9ADBEB5B0DDABD086A7544E3FDF47CD7A011FF7EA40, cn=VIDYA RAMAPPA HAMPAYYA
Date: 2026.10.19 17:28:30 +05'30'

**(विद्या हम्पया)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई
२) मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
४) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व), मुंबई - ५१.
५) सहसचिव / उपसचिव, ( का.१२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६) सहसचिव/ उपसचिव, (आ(वर्ग-१)) जलसंपदा विभाग, मंत्रालय मुंबई
७) सहसचिव/ उपसचिव,(सेवा-१) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई
८) सचिव, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई
९) अवर सचिव (विधी), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) अवर सचिव (गृनिभू), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
११) निवड नस्ती (गृनिभू) , गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई